## स्थायी निदेश क्र. ०१

क्र. नपसु/२०००/प्र.क्र.५/२०००/५
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
गृहनिर्माण भवन, तळ मजला,
कलानगर वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक १४ ऑगस्ट २०००.

प्रति,
१) विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय : नगरपरिषदांची वार्षिक तपासणी - सुधारीत तपासणी नमुने.**

आपल्या राज्यातील नगरपरिषदांच्या कामकाजांचा मागील एक महिन्यात मी आढावा घेतला आहे. या आढाव्यावरुन असे दिसून येते की, बहुतांशी नगरपरिषदा सध्या आर्थिकदृष्टया दुबळ्या अवस्थेत आहेत. त्यापैकी काही नगरपरिषदा तर केवळ कर्मचा-यांच्या पगारावरील खर्चाइतकेच उत्पन्न मिळवित आहेत. अशा या बिकट आर्थिक अवस्थेमध्ये असल्याने स्थानिक रहिवाशांच्या अपेक्षेप्रमाणे नगरपरिषदा सेवा पुरविण्यास असमर्थ ठरत आहेत. नागरिकांना पुरविल्या जाणा-या मुलभूत सेवा एकतर पुरविल्या जात नाहीत किंवा जेथे पुरविल्या जात आहेत तेथे त्यांचा दर्जा चांगला नाही. सेवेचा दर्जा चांगला नाही म्हणून बहुतांश नागरीक त्या सेवांकरीता वाढीव दराने कर किंवा फी भरण्यास तयार होत नाहीत. कर व फी यांच्यापासून मिळणारे उत्पन्न कमी असल्याने सेवेचा दर्जा सुधारण्याकरीता नगरपरिषदांकडे पुरेसा निधी उपलब्ध होत नाही, परिणामतः सेवेचा दर्जा आणखी खालावत जातो आणि नगरपरिषदा सेवांचा दर्जा सुधारण्यामध्ये यशस्वी होत नाहीत. सध्या अशा दुष्टचक्रात सापडलेल्या अवस्थेतून नगरपरिषदांना बाहेर काढण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न होऊन उपाययोजना हाती घेणे आता अत्यावश्यक झालेले आहे.

०२. आपणांस कल्पना आहेच की, नगरपरिषदांच्याय दैनंदिन कारभारावर प्रशासकीय नियंत्रण ठेवता यावे आणि पर्यवेक्षण करता यावे यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ च्या कलमामधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, प्रादेशिक संचालक व संचालक, नगरपालिका प्रशासन अशा प्राधिका-यांची साखळी निर्माण करण्यांत आलेली आहे. या प्राधिका-यांकडून दरवर्षी नगरपरिषदांची प्रशासकीय तपासणी केली जात असली तरीही अशा तपासणीचा उपयोग नगरपरिषदांचा कारभार सुधारण्यामध्ये फारशा प्रमाणात होत आहे असे जाणवत नाही.

०३. आतापर्यंत या वार्षिक तपासणीसाठी संचालनालयाकडून जे नमूने विहित करण्यांत आलेले आहेत त्यांचे मी अवलोकन केले आहे. त्यावरुन संकलित होणारी माहिती नगरपरिषदांच्या कारभाराचे आर्थिकदृष्टया विश्लेषण व मिमांसा करण्याकरिता पुरेशी उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे अशा तपासणी अंती नगरपरिषदांना वेळीच योग्य ते मार्गदर्शन करणे आणि नगरपरिषदांच्या कारभारामध्ये ज्या अनियमितता घडतात त्यावर प्रभावी नियंत्रण आणणे शक्य होत नाही.
उदा. नगरपरिषदांमध्ये झालेला अनियमित खर्च लेखापरीक्षणा अंती भार किंवा अधिभाराच्या स्वरुपात वसूल केला जात नाही. असे करात यावे याकरीता आवश्यक ती माहिती सध्याच्या नमुन्यावरुन तपासणीअंती तयार होत नाही. तसेच बेकायदेशीर व अनियमित होणा-या नेमणूका आणि पर्यायाने नगरपरिषदांमध्ये ब-याच प्रमाणात खर्चाची होत असलेली उधळपट्टी या बद्दलची अचूक अशी माहिती तपासणीअंति तयार होत नाही, त्यामुळे अशा अनियमिततेवर वेळीच प्रभावी नियंत्रण आणणे शक्य होत नाही. याशिवाय कायदयातील कलम ५८ (२) खाली नगराध्यक्षांकडून घेतले जाणारे सर्वच निर्णय योग्य व समर्थनीय आहेत असे दिसून येत नाही. तपासणीअंती अशा निर्णयाची निश्चित माहिती समोर येत नाही, म्हणून अशा निर्णयावर बंधन आणणे जिल्हाधिका-यांना शक्य होत नाही.

वरील मुद्दे विचारात घेता नगरपरिषदांच्या वार्षिक तपासणी साठी वापरले जाणारे ६७ नमुने सुधारीत करण्यात आलेले आहेत आणि अशा सुधारीत नमुन्यांचा संच आपणास पाठवित आहे. यापुढे नगरपरिषदांच्या वार्षिक तपासणीसाठी आपण या संचाचा वापर करावा.

०४. तयार करण्यांत आलेल्या नवीन नमुन्यांची संख्या पूर्वीपेक्षा निश्चितच अधिक आहे परंतू मला वाटते की, या नमुन्यामध्ये नगरपरिषदांच्या कारभाराची सखोल व निश्चित अशी माहिती आपल्याला मिळविणे शक्य होईल, जेणेकरुन नगरपरिषदांच्या कारभारावर पर्यवेक्षण व नियंत्रण प्रभावी करण्यामध्ये मदत होईल. पर्यायाने नगरपरिषदांना आर्थिकदृष्टया सबळ करणे, त्यांच्याकडून पुरविल्या जाणा-या मुलभूत सेवांचा दर्जा सुधारणे, तेथील कर्मचा-यांचे तंत्रज्ञान, कौशल्य आणी कार्यक्षमतेमध्ये वाढ करणे आणि नगरपरिषदांच्या खर्चात काटकसर करुन एंकदरीत कारभारामध्ये अधिक शिस्त निर्माण करणे आपल्या तपासणीद्धारे शक्य होईल असा मला विश्वास वाटतो.

०५. नगरपरिषदांची प्रशासकीय तपासणी आर्थिक वर्षामध्ये केंव्हाही झाली तर नगरपरिषदांनी मागील आर्थिक वर्षापुरती या सर्व नमुन्यांमध्ये अचूक माहिती दरवर्षी जून अखेरपर्यंत तयार करुन ठेवावी. तपासणी प्राधिकारी म्हणजेच जिल्हाधिकारी, प्रादेशिक संचालक व संचालक, नगरपरिषद प्रशासन यापैकी कोणीही असले तरी तयार करण्यात आलेल्या माहितीचा संच संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांचेकडे दरवर्षी जुलै महिना अखेरीस सादर करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात तपासणीच्या वेळी नगरपरिषदेची चालू वर्षाची अधिक माहिती स्वतंत्ररित्या सादर करता येईल. अशाप्रकारे दरवर्षी तयार होणा-या माहितीवरुन नगरपरिषदांच्या कारभारबद्दलची मुलभूत सांख्यिकी माहिती (डेटा बेस) तयार होईल आणि अशा माहितीचा उपयोग इतर संस्थांना होवू शकेल. त्याप्रमाणे वेगवेगळ्या कार्यालयासाठी वारंवार नवीन माहिती संकलित करण्याची गरजही राहणार नाही.

०६. नगरपरिषदांच्या कारभारामध्ये सुधारणा व्हावी याकरिता सोबत जोडलेल्या नमुन्यांमध्ये आपणास काही अतिरिक्त माहिती किंवा मुद्दे समाविष्ट करणे आवश्यक वाटल्यास तसे आपण करावेत आणि त्याबद्दल मलाही कळवावे अशी आपणास विनंती आहे. (नमुने समाविष्ट केलेले नाहीत)

( भगवान सहाय )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रतिलिपी :
मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व) यांजकडे नमुन्यातील माहितीच्या संचासह माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.